INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor - 6.625

ISSN - 2348-7143


INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

November -2019 Special Issue – 206




Guest Editor :
Dr. Dhanaji Gurav
Principal,
Dr. Babasaheb Ambedkar College of Arts,
Science and Commerce, Mahad,
Dist. Raigad. (MS) India.

Executive Editor
Prof. Yogesh Borale
Asst. Prof. of Psychology,
Dr. Babasaheb Ambedkar College of Arts,
Science and Commerce, Mahad,
Dist. Raigad. (MS) India.

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 206 : Philosophy
ISSN : 2348-7143
November-2019

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान | डॉ. यशवंत मनोहर | 05 |
| 2 | Dr. B. R. Ambedkar and His Views on Yoga Philosophy | Dr. Sushim Dubey | 14 |
| 3 | Buddha Philosophy and Western Psychology | Mr. Yogesh Borale | 23 |
| 4 | Dr. Ambedkar's Perspective on Women Empowerment : A Retrospection | Dr. Rina Pitale-Puradkar | 29 |
| 5 | Fashioning Dignity : Gandhi Ambedkar | Dr. Harish Navale | 33 |
| 6 | डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्या धर्मांतर संकल्पनेचा तात्त्विक व सामाजिक अन्वयार्थ | डॉ. वामन पाटील | 38 |
| 7 | तार्किक प्रत्यक्षार्थवाद एक वैचारिक चळवळ | डॉ. अमन बगाडे | 48 |
| 8 | धर्म विषयक आधुनिक उपपत्ती - तर्कतीर्थाची मांडणी | डॉ. नवनाथ रासकर | 52 |
| 9 | जे.कृष्णमूर्ती यांचे मृत्यू विषयक विचार | डॉ. ग्यानदेव उपाडे | 57 |
| 10 | भ्रष्टाचार – एक सामाजिक दुरित व त्यांच्या निर्मुलनासाठी तत्त्वज्ञानाची प्रस्तुतता | अरुण पाध्ये | 61 |
| 11 | बौद्ध दर्शनातील ब्रम्हविहार संकल्पना | डॉ. सुनिलदत्त गवरे | 75 |
| 12 | तत्त्वज्ञान महाजालावर ! नवी आव्हाने व नवी आवाहने आणि व्यावसायिक तत्त्वज्ञान व व्यावसायिक तत्त्ववेत्त्यांचे उत्तरदायित्व | श्रीनिवास हेमाडे | 79 |
| 13 | अस्तित्ववादाची शिक्षणविषयक भूमिका | प्रा. धनराज हाडूळे | 82 |
| 14 | तर्कशास्त्र : काल, आज आणि उद्याही | प्रा. सुनिल भोईटे | 87 |
| 15 | अस्तित्ववाद : मानवी जीवन गौरवाचे तत्त्वज्ञान | डॉ. रेखा शेरकर | 92 |
| 16 | विटगेन्स्टाइनची नीतिशास्त्रीय भूमिका | डॉ. सचिन खोकले | 97 |
| 17 | पर्यावरण नीतिशास्त्र | डॉ. विजय शेंडगे | 100 |
| 18 | तार्किक प्रत्यक्षार्थवादाचे प्रचीतीक्षमतेचे तत्त्व आणि सत्ताशास्त्राचे खंडण | डॉ. किरण सावे | 103 |
| 19 | पर्यावरण व उपयोजित नीतिशास्त्र | प्रा. जगन्नाथ कदम | 116 |
| 20 | सुधारणात्मक सिध्दांत (नैतीक दृष्टिकोन) | डॉ. वृशाली आंबटकर | 119 |
| 21 | टी. एच्. ग्रीन | संध्या जोशी | 122 |
| 22 | अस्तित्त्ववादाचा तत्त्वज्ञानात्मक विकास | डॉ. बाजीराव पाटील | 128 |
| 23 | पर्यावरणीय नैतिक तत्त्वज्ञान : एक चिकित्सक मागोवा | डॉ. सुनील भिसे | 131 |
| 24 | खरा पातंजल - योग : एक आधुनिक प्रवाह | डॉ. शर्मिला वीरकर | 136 |
| 25 | महानुभाव संप्रदायाच्या सामाजिक कार्याची तात्त्विक चौकट | डॉ. सचिन राजपूत | 142 |
| 26 | सार्त्रची 'स्वातंत्र्य' आणि उत्तरदायित्वाची संकल्पना | प्रा. शीतल येरुले | 146 |
| 27 | अस्तित्त्ववादी तत्त्वज्ञानाच्या उदयाची कारणे | रोहित गायकवाड | 148 |
| 28 | अस्तित्त्ववादी तत्त्वज्ञानातील 'मृत्यू' संकल्पनेविषयीचे विविध दृष्टीकोन | डॉ.माधव कांबळे | 151 |
| 29 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बुद्ध धर्माचा स्वीकार करण्यामागचे तत्त्वज्ञान | प्रा. धनराज लझडे | 156 |
| 30 | संत तुकारामांची 'संत' संकल्पना | श्रीनिवास भिसे | 162 |

| | | |
|---|---|---|
| 31 | महात्मा गांधीजींचे सामाजिक व राजकीय विचार - एक तात्विक अभ्यास **डॉ. सखाराम गोरे** | 164 |
| 32 | अस्तित्ववाद : एक संक्षिप्त आकलन **प्रा. सुखदेव लोखंडे** | 168 |
| 33 | कृतीशील तत्त्वज्ञ संत श्री नारायण गुरु यांचे अद्वैत वेदान्त तत्त्वज्ञानाधिष्ठित क्रांतिकारक कार्य **डॉ. नारायण गडदे** | 170 |
| 34 | विटगेन्स्टाइनची खाजगी भाषेची संकल्पना **डॉ. बाळासाहेब मुळीक** | 175 |
| 35 | कार्ल मार्क्सचा भौतिकवाद **डॉ. स्वाती कुलकर्णी** | 180 |
| 36 | पश्चिम बंगाल मधील दोन आधुनिक विचार प्रवाह **श्रीमती सायरा मुलाणी व डॉ. एन. के. रासकर** | 182 |
| 37 | जात्यावरील ओव्या : प्रेमाचा दिव्यसंदेश **स्वाती चेणगे व डॉ. पुरंदर चौगुले** | 187 |
| 38 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची हिंदुधर्माच्या तत्त्वज्ञानाची समीक्षा **डॉ. मंगला आठल्ये** | 195 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

**Published by –**

**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**

**Email** : swatidhanrajs@gmail.com **Website** : www.researchjourney.net **Mobile** : 9665398258

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 206 : Philosophy
ISSN : 2348-7143
November-2019

# अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाच्या उदयाची कारणे

**रोहित सुधाकर गायकवाड**
सहाय्यक प्राध्यापक तत्त्वज्ञान विभाग.
सोनोपंत दांडेकर कला, व्ही.एस. आपटे वाणिज्य आणि
एम.एच. मेहता विज्ञान महाविद्यालय,
पालघर, ता.जि. पालघर.

प्रत्येक काळाच्या विकासाबरोबर मनुष्याच्या बौध्दिकतेचाही विकास होत असतो आणि त्यात काळानूसार बदल होत असतो हाच बदल विचाराधारा व त्या काळातील एक महत्त्वपुर्ण तत्त्वज्ञान बनून पुढे येत असते. यामुळेच काळाबरोबर तत्त्वज्ञानाच्या विचारधारेमध्ये बदल होत असतो. याच विचारातून तत्वज्ञ मनुष्याच्या जीवनाचा अभ्यास करुन भविष्यातील विचारांची मांडणी करताना दिसतात. त्यांच्या विचारांमध्ये युगपरिवर्तनाची शक्ति असते. यासाठी कोणत्याही तत्त्वज्ञानास किंवा नवीन विचारप्रवाहास संपुर्णपणे समजून घेण्यासाठी त्या विचारधारेच्या वेळी असणारी परिस्थिती काय होती? ही विचारधारा कोणकोणत्या परिस्थितीतून निर्माण झाली त्यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक धार्मिक परिस्थितींचा आढावा घेणे आवश्यक असते. तत्त्वज्ञानातील अस्तित्ववादी विचारधारा विकसित होण्यामागे काही तत्कालिन परिस्थिती कारणीभूत होती ती परिस्थिती म्हणजे हेगेलियन चिद्वाद, फ्रांन्सची राज्यक्रांती, दोन्ही जागतिक महायुध्दे, औद्योगिकरण व विज्ञान तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव यामुळे होत चाललेला मानवी संवदेनशीलतेचा अभाव या सर्वबाबी कारणीभूत मानल्या जातात त्या बाबी पुढील प्रमाणे सांगता येतील.

**अस्तित्ववादी पूर्व तत्त्वज्ञान:**

युरोपातील तत्कालिन तत्त्वज्ञान व विचारांना सुव्यवस्थित मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. अस्तित्ववादी तत्त्वज्ञानापूर्वी विश्वचिंतन, धार्मिकचिंतन व वस्तुनिष्ठचिंतन याला महत्त्व दिले जात होते. मानवी मन व भावना, त्यांचे व्यक्तिमत्व व मानवी अस्तित्व या गोष्टीकडे दुर्लक्ष केले जात असे. मनुष्याच्या भावनांना मनातल्या मनात दाबून ठेवण्यात येत असे. मानवी मन, भावना याच्या अस्तित्वाकडे फारसे लक्ष पारंपारिक तत्त्वज्ञाने दिले नाही. म्हणून तत्कालिन आस्तित्ववादी विचारधारेचा या पांरपारिक विचारधारेवर थोडा देखील विश्वास नव्हता. अस्तित्ववादाने मानवी स्वः चिंतनावर अधिक भर दिला, त्यास अधिक सशक्त, उपयुक्त व समर्थ बनवून मानवी जीवनास अधिक प्रतिष्ठा प्राप्त करुन देण्याचे कार्य केले. अस्तित्ववादी निर्मितीच्या समर्थनासाठी एक महत्त्वपुर्ण कारण सांगण्यात येते की, मनुष्याचा स्वाभव हा आपल्या अस्तित्वाबाबत सतत असंदिग्ध व गोधंळलेला असतो. त्याचे निश्चित असे स्वरुप किंवा रुप नसते तो सतत बदलत असतो पण स्वत:चे अस्तित्व मात्र कायम ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. याच विचारांवर अधारित अस्तित्वादी विचारधारा विकसित होत गेली.

अस्तित्ववादी विचाराच्या पूर्वी कित्येक तत्त्वचिंतकांनी इंद्रिय विषयक लेखन करुन त्या संदर्भात धार्मिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक तत्त्वज्ञान जगासमोर आणण्याचा प्रयत्न केला. या तत्त्वज्ञानाचा अनुभव आपण आपल्या इंद्रिया द्वारे करु शकत असत. यामध्ये 'प्लेटो च्या मतानुसार, सार हे प्राथमिक आणि मुख्य असून संसारातील सर्व वस्तूंचे अस्तित्व हे सार रुपात असते. कारण वस्तुंची निर्मिती होते तसेच त्या नष्ट होतात. म्हणजेच त्या 'सर्जन' व 'नाश' होत असतात. त्याच्यां मते यामध्ये

ISSN : 2348-7143
November-2019

'सार' चा शोध घेणे हाच तत्त्वज्ञानाचा उद्देश असतो असे मानले जात होते.' परंतु अस्तित्ववाद प्लेटोच्या या विचाराचे खंडन करतात. अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाने 'सारत्व' पेक्षा 'अस्तित्व' याला अधिक प्राधान्यक्रम दिल्याचे दिसून येते. अशाप्रकारे अस्तित्वादी विचारसरणी परंपरागत तत्त्वज्ञाना विरोधी एक नवीन प्रतिक्रिया किंवा नवीन विद्रोह म्हणून विकसित होत गेली.

**जागतिक महायुध्दाचा प्रभाव :**

अस्तित्ववादाच्या उदय, विकास व प्रसारामध्ये जागतिक महायुध्दांचा देखील फार मोठा प्रभाव आपणास दिसून येतो. या जागतिक महायुध्दांचा परिणामामुळे हा आर्थिक नुकसान, राजकीय व सांस्कृतिक विद्रुपता, वैषम्य, अस्थिरता आणि निराशेची भावना अधिकप्रमाणात वाढली होती. दोन्ही जागतिक युध्दामुळे हिंसात्मक राज्यक्रांती आणि गंभीर स्वरुपाची आर्थिक मंदी निर्माण झाली होती. युध्द काळात मनुष्याने आपल्या आयुष्यभराची कमाई एका क्षणात नष्ट होताना पाहिली आहे. प्रत्येक दिवशी आपल्या मित्रांना, सहकार्यांना मरताना पाहिले आहे. बॉम्ब फेक, हवाई हमला यांच्या गडगटाने व आवाजाने तसेच यातून वाचण्यासाठी सैरावैरा पळणारे, जीवनावश्यक वस्तू पासून वंचित राहणारा मनुष्य या काळात दिसून आलेला आहे. युध्दांमध्ये लाखों करोडों लोक मारले गेले. यावरुन आपणास असे दिसून येते की, जागतिक युध्दांचा परिणाम किती भयंकर स्वरुपाचा विनाशकारी होता. या महायुध्दांमुळे जगातिल कानाकोपऱ्यात राहणाऱ्या प्रत्येक नागरिक, कुटुंब हा आर्थिकदृष्टया खचलेला होता तसेच बेरोजगारीचे प्रमाण वाढत गेले होते.

पहिल्या जागतिक महायुध्दाच्या दु:खातून जग सावरत होते इतक्यातच दुसऱ्या महायुध्दाची सुरुवात झाली होती. यामुळे युध्दकाळात भयान व स्तब्ध असणारी शहरे, गल्ल्या, रस्ते हे मानवी अस्तित्वाचा प्रश्न निर्माण करीत होते. यातच जर्मन सैन्यांचा आंतक त्यांच्याद्वारे होणारा त्रास यामुळे अनेक नागरिक त्रस्त झाले होते. संपूर्ण युरोप मध्ये मानवी अस्तित्वाचे स्वप्न नेतृत्वाला पडत होते. युरोपच्या नेतृत्वांमध्ये अंहकार आणि सत्तेचा अंहम मोठया प्रमाणात निर्माण झाला होता. युध्दाच्या परिणामामुळे आत्म सन्मानाची भावना जागृत झाली.

दोन्ही जागतिक महायुध्दाचा परिणाम मानवी जीवन शुद्रतापूर्ण, नरसंहरता, स्वार्थीवृत्ती आणि द्वेषाने भरलेले होते. विश्वामध्ये सर्वत्र निराशा, वेदना, करुणेचे वातावरण निर्माण झाले होते. जीवन आणि परंपरागत मूल्य यांच्यात अनिश्चितता निर्माण झाली होती. मनुष्यांने मानवी नरसंहार मोठ्याप्रमाणात अनुभवला व पाहिलाही होता. त्यातून एक मानवी अस्तित्वाविषयक नवीन दृष्टीकोन निर्माण होत होता. युध्दांनतंर मनुष्याजवळ कोणतीच वस्तू, संपत्ती शिल्लक राहिली नव्हती, केवळ शिल्लक होते मनुष्याचे अस्तित्व. 'जीवन हे क्षणभंगूर असून मृत्यू हे अंतिम सत्य आहे' या दृष्टीकोनाने आजच्या मनुष्यास दु:खी केले आहे. मनुष्य आपले अस्तित्व बनविण्यासाठी स्पर्धा करत आहे. औद्योगिकरण, यांत्रिकता यास महत्त्व प्राप्त झाले आहे. व मनुष्य हा या सर्वांच्या हातातील कठपुतली बनला आहे. ज्याचे अस्तित्व केवळ एक खेळणी इतके होते जी निर्जिव असते. मनुष्याला स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्याची गरज निर्माण झाली. ही सर्व परिस्थिती अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाच्या उदयास कारणीभूत ठरली आहे.

**विज्ञान व तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव :**

दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर औद्योगिक क्रांती झाली. नवनवीन शोध लावले जात होते, यातच विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास होऊन नवीन औद्योगिक शहरे निर्माण झाली. औद्योगिकरणामुळे

ISSN : 2348-7143
November-2019

रोजगाराची संधी वाढली परंतू यामध्ये अकुशल कामगारांची संख्या अधिक प्रमाणात वाढत होती. ग्रामीण भागातील लोक शहरांकडे रोजगारासाठी धाव घेऊ लागले. यामुळे ग्रामीण समाजाचे व कुटुंबाचे विघटन होत गेले. शहरीकरणामुळे मानवामानवातील संबंधात बदल, सामाजिक संस्थांमध्ये बदल होत होता. शहरातील मानवाच्या परस्परांतील संबंधामध्ये बदल होत होता. भांडवलशाहीचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत होते. संपूर्ण युरोप मध्ये युगांतकारी परिवर्तन होत होते. यातच मनुष्याच्या व्यक्तिगत विचारधारांचा विकास होऊन त्यांच्या विविध बाजू समोर आणल्या जात होत्या. या सदंर्भात औद्योगिक क्रांतीचे समीक्षक इयान वाट यांचे निरीक्षण उल्लेखणीय होते त्यांच्या मते व्यक्तीवादी विचारसरणीच्या पाठीमागे भांडवलशाही व्यवस्था असल्याचे दिसून येते. व याच विचारांमुळे राजकीय विचारवंत व तत्त्वज्ञ यांना अधिक प्रभावित केले होते. 'व्यक्ति स्वातंत्र्य आणि व्यक्तिचे अस्तित्व' याबाबत विचार करण्यास भाग पाडले. याचा परिणाम तत्वज्ञानावर झाला विशेषत: आस्तित्ववादी विचारवंतावर अधिक झाला होता. अस्तित्ववाद्यांच्या मते विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रसार जेवढा अधिक तेवढी मानवता संपुष्टात येत होती. यंत्र पूर्वी मनुष्याचे गुलाम होते परंतु आज मनुष्य हा यंत्राचा गुलाम झाला आहे म्हणजेच यंत्र हे साध्य बनले आहे व मानव साधन बनला आहे. ज्यामुळे मानवी मनामध्ये विधायक व सकारात्मक भावना निर्माण न होता केवळ भिती, घृणा, नैराश्य अशा नकारात्मक गोष्टींचा जन्म होत आहे. यातच विज्ञानामुळे विश्वसंहारक अशा आण्विक शस्त्रांस्त्रांची निर्मिती केली गेली ज्याच्या समोर मानवी अस्तित्व केवळ किडया मुंग्याप्रमाणे झाले होते. या सर्व बाबीमुळे मनुष्याचा मृत्यू हा नैसर्गिक न राहता पिडादायक व दु:खदायक स्थितीतून जात असे. यामुळेच मानवी अस्त्वित्वाची पुनरप्रतिष्ठा प्राप्त करणे गरजेचे होते. व या विचारातून आस्तित्ववादी विचारसरणीचा उदय झाला. अस्तित्ववादी विचारातील मानव हा चितंनाचा प्रमुख केंद्रबिंदु बनला.

अशा परिस्थितीतून आजच्या मनुष्याच्या जिवनातील, तत्त्वज्ञान व साहित्यातील अस्तित्त्ववादी ही विचारसरणी उदयास आली आहे जी आजच्या 21 व्या शतकात देखील अत्यंत आवश्यक व उपयुक्त असल्याचे दिसून येते.

**संदर्भ :**

1. खटाटे राजेंद्र, असंगतता -किर्केगार्ड आणि कामू, परामर्श, तत्त्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.
2. डॉ. चोले सचिन रमेशराव, निर्मल वर्मा के साहित्य में अस्तित्ववाद, संकल्प प्रकाशन, लातूर, 2016
3. मनोहर रवींद्र, अस्तित्ववाद, भारत मुद्रक प्रकाशक लि. औरंगाबाद, महाराष्ट्र,
4. Karl Jaspers, as Quoted from reason in existentialism, Ramakant Sinari
5. डॉ. चंदा गिरीश, अस्तित्ववादी हिंदी कहानी , अस्तित्ववाद : उद्‌भव स्वरप एवं विकास,

## COSMOS IMPACT FACTOR

Search Journal | Search

HOME | INDEXED JOURNAL | SUGGEST JOURNAL | REQUEST IF | DOWNLOAD LOGO | REVIEWER PANEL



**Category**

- INDEXED JOURNAL
- SUGGEST JOURNAL
- JOURNAL IF
- REQUEST FOR IF
- DOWNLOAD LOGO
- CONTACT US

**SAMPLE CERTIFICATE**

**SAMPLE EVALUATION SHEET**

## Journal Detail

| | |
|---|---|
| **Journal Name** | RESEARCH JOURNEY |
| **ISSN/EISSN** | 2348-7143 |
| **Country** | IN |
| **Frequency** | Quarterly |
| **Journal Discipline** | General Science |
| **Year of First Publication** | 2014 |
| **Web Site** | www.researchjourney.net |
| **Editor** | Prof. Dhanraj Dhangar & Prof. Gajanan Wankhede |
| **Indexed** | Yes |
| **Email** | researchjourney2014@gmail.com |
| **Phone No.** | +91 7709752380 |
| **Cosmos Impact Factor** | 2015 : 3.452 |

## GIF GLOBAL IMPACT FACTOR

News Updates: Due to large number of application please allow us time to update your journal



**Get Involved**

- Home
- Evaluation Method
- Journal List
- Apply for Evaluation/Free Service
- Journal Search

**Recently Added Journals**

| Research Journe | |
|---|---|
| ISSN | 2348-7143 |
| Country | India |
| Frequency | Quarterly |
| Year publication | 2014-2015 |
| Website | researchjourney.net |
| Global Impact and Quality Factor | |
| 2014 | 0.565 |
| 2015 | 0.676 |

## Research Journey

**SJIF 2019:**

**6.625**

Area: Multidisciplinary

Evaluated version: online

**Previous evaluation SJIF**

2018: 6.428
2017: 6.261
2016: 6.087
2015: 3.986

**The journal is indexed in:**

SJIFactor.com

**Basic information**

| | |
|---|---|
| Main title | **Research Journey** |
| Other title [English] | Research Journey |
| Abbreviated title | |
| ISSN | 2348-7143 (E) |
| URL | http://WWW.RESEARCHJOURNEY.NET |
| Country | India |
| Journal's character | Scientific |
| Frequency | Quarterly |
| License | Free for educational use |
| Texts availability | Free |

**Contact Details**

| | |
|---|---|
| Editor-in-chief | Prof. Dhanraj Dhangar<br>M.G.V.'S ARTS & COMMERCE COLLEGE, YEOLA, DIST NASHIK<br>India |
| Publisher | MRS. SWATI SONAWANE |

**SWATIDHAN PUBLICATIONS**

**Price : Rs. 800/-**

**For Details Visit To : www.researchjourney.net**